**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्या कडील भविष्य निर्वाह निधी व गट विमा योजनेच्या वसुली बाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : ग्रापापु-१०९८/प्र.क्र.१२९/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : ४ एप्रिल, १९९८.**

**पहा :-** शासन निर्णय पा.पु.व स्व. वि.क्र. ग्रापापु-१०९३/प्र.क्र.८१९/पापु-०७ दिनांक ६.३.९७

**प्रस्तावना :-**

राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण १७ विभाग व १०३ उप विभाग संदर्भीय शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आले आहेत. या १७ विभाग व १०३ उपविभागा कडील कार्यकारी अभियंता व उप अभियंता या पदी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील अभियंत्यांना नियुक्ती देण्याचे ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडील अधिकाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी व गट विमा योजनेचे लेखे हे महालेखापाल कार्यालयामार्फत ठेवले जात नसून ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फतच ठेवण्यात येत असल्याने जिल्हा परिषंदाअंतर्गत पाणी पुरवठा विभागात व उप विभागात कार्यकारी अभियंता व उप अभियंता पदी कार्यरत अभियंत्यांच्या भविष्य निर्वाह निधी व गट विमा योजनेच्या वर्गणीची वसूली संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून परस्पर करता येत नव्हती व याबाबत उपस्थित झालेल्या अडचणीबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती करण्यात आली आहे.

**परिपत्रक :-**

प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी लक्षात घेऊन शासन आता अशा सूचना देत आहे की, जिल्हा परिषदे अंतर्गत पाणी पुरवठा विभाग व उप विभागावर कार्यरत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडील कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्या भविष्य निर्वाह निधी व गट विमा योजनेच्या वर्गणीची वसुली संबंधीत कार्यालयाने त्यांना वेतन अदा करण्यापूर्वी दरमहा करुन घ्यावी व त्या रक्कमेच्या धनादेश/धनाकर्ष विवरणपत्रासह दरमहा दहा तारखेपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ या पत्यावर पाठविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(रु. न. देशमुख)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**



७८

प्रति,

१. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

३. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

४. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

५. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद (सर्व)

६. उप अभियंता, पाणी पुरवठा उप विभाग जिल्हा परिषद (सर्व) (मुख्य कार्यकारी अधिकारी मार्फत)

७. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

८. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन, नवी मुंबई- ४००६१४

९. निवड नस्ती , पापु-०७.